वस्त्रोद्योग धोरण २०११-१३ अंतर्गत केंद्र
पुरस्कृत TUFS योजनेशी निगडीत दीर्घ
मुदती कर्जावर व्याज सवलत योजना

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
शासन परिपत्रक क्र धोरण -२०१२/प्र.क्र.१७८/टेक्स-२
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२.
**दिनांक : १३ ऑगस्ट , २०१२**

संदर्भ :- १) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
क्रमांक धोरण-२०१२/प्र.क्र.१/टेक्स-१, दिनांक १/३/१२
२) भारत सरकार वस्त्रोद्योग मंत्रालय, परिपत्रक क्र.५०(३)/२०११-MS ,
दिनांक १५/०६/२०१२

**परिपत्रक :-**

संदर्भिय अ.क्र.१ येथील दि १/३/१२ च्या शासन निर्णयान्वये शासनाने वस्त्रोद्योग धोरण २०११-१२ अंतर्गत दीर्घ मुदती कर्जावर व्याज सवलत योजना लागू केली आहे. सदर योजना वस्त्रोद्योग मंत्रालय, भारत सरकार, शासन निर्णय क्रमांक ६/५/२०११ टी.यु.एफ.एस/ दिनांक २८ एप्रिल २०११ अन्वये मान्यता दिलेल्या रिस्ट्रक्चरर्ड TUFS योजनेशी निगडीत आहे. भारत सरकार, वस्त्रोद्योग मंत्रालय, परिपत्रक क्र.५०(३)/२०११-MS दिनांक १५.६.२०११ अन्वये रिस्ट्रक्चरर्ड TUFS योजनेमध्ये कोणतेही फेरबदल न करता वित्तीय वर्ष सन २०१२-१३ साठी दिनांक १.४.२०१२ पासून पूर्वलक्षी प्रभावाने चालू ठेवण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे.

२. केंद्र पुरस्कृत रिस्ट्रक्चरर्ड TUFS उपरोक्त दिनांक २८.४.२०११ शासन निर्णयामधील अटी व शर्तीनुसार पुन्हा लागू करण्यात आली असल्याने राज्य शासनाच्या दीर्घ मुदती व्याज सवलत योजनेबाबतच्या संदर्भिय दिनांक १ मार्च २०१२ च्या शासन निर्णयातील तरतूदी आहेत तशा दिनांक ३१.३.२०१३ पर्यंत लागू राहतील.

३. केंद्र शासनाने दिनांक १.४.२०१३ नंतर TUFS अंतर्गत काही बदल केल्यास सदर बदल राज्य शासनाच्या व्याज योजनेस आपोआप लागू होणार नाहीत. त्या अनुषंगाने राज्य शासनाच्या व्याज सवलत योजनेमध्ये आवश्यकतेप्रमाणे अनुषंगिक सुधारणा करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( र. मो. आडे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव.
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री (खाजगी सचिवामार्फत), मंत्रालय,मुंबई.
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
सर्व अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव /सचिव, मंत्रालय, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभाग.
सर्व विभागीय आयुक्त.
सर्वं जिल्हाधिकारी.
वस्त्रोद्योग आयुक्त, भारत सरकार, मुंबई.
संचालक (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर.
महासंचालक, माहिती व प्रसिध्दी संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई.
महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-१, मुंबई.
महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर.
महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-२, नागपूर.
सर्व जिल्हा उद्योग अधिकारी.
अध्यक्ष / मुख्य व्यवस्थापकीय संचालक,आय.डी.बी.आय. बँक, एस.आय.डी.बी.आय.बैंक व केंद्र पुरस्कृत TUF योजनेअंतर्गत सर्व नोडल बँक.
निवड नस्ती (टेक्स-२)